# चेंबूर पोलिसांमार्फत ६५ मोबाईल धारकांचे हरवलेले मोबाईल वितरित



तहलका समाचार, प्रतिनिधी

**मुंबई, :-** चेंबूर पोलीस ठाणेच्या हद्दी मध्ये हरवलेल्या मोबाईलचा CEIR या पोर्टलच्या माहितीच्या आधारे तांत्रिक कौशल्याचा वापर करून माहितीच्या साह्याने विविध राज्यातील सर्व मोबाईल वापरकर्त्यांचा शोध घेऊन जवळपास 65 मोबाईल धारकांना त्यांचे मोबाइल पुन्हा मिळवून देण्याचे कार्य चेंबूर पोलिसांनी केले आहे. चेंबूर परीमंडळ 6 चे पोलीस उप आयुक्त समीर शेख, चेंबूर विभागाचे सहायक पोलीस आयुक्त रामराव ढिकले, चेंबूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सदानंद राणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे ) चे मनीष आवळे,(का.व.सु.) सहा.पोलीस निरीक्षक चे दीपक साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली चेंबूर पोलीस ठाणे येथील सायबर पथकाचे पोलीस उपनिरीक्षक संदीप पाटील मपोशि.151485/मांढरे, मपोशि.151612/महाडिक आदींच्या प्रयत्नातून चेंबूर पोलीस ठाणे मध्ये नोंद करण्यात आलेल्या हरवलेल्या मोबाईलचा CEIR या पोर्टलच्या माहितीच्या आधारे तांत्रिक कौशल्याचा व मानवी कौशल्याचा व माहितीचा निरंतर पाठपुरावा करून सर्व मोबाईलचे वापरकर्ता यांचा शोध घेतला आहे. मुंबई तसेच गुजरात, उत्तर प्रदेश, झारखंड, बिहार,पश्चिम बंगाल, राजस्थान, केरळ, कर्नाटक, अशा विविध परराज्यातून एकूण 65 मोबाईल एकूण किंमत 7,35,400 रुपयांची मालमत्ता प्राप्त करून तक्रारदारांना दिनांक 21 जुलै 2025 रोजी त्यांचे मोबाईल वितरण केले आहे.